गहु संशोधन विभाग,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला
अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

डॉ. स्वाती जी.भराड,
वरीष्ठ संशोधन शास्त्रज्ञ,(गहू)

☎ 0724-2258200-217 Extn 1069
फॅक्स : 091-0724-2258419
ई-मेल : srswheat@pdkv.ac.in

क्रं. व.सं.शा./गहू/२५०/2023

दिनांक : १९/१२/ 2023

## दरपत्रक सुचना

प्रति,

मे. ..........................................

..........................................

विषय :वरीष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, गहू संशोधन विभाग, डॉ. पंदेकृवि., अकोला या कार्यालयाकरीता सहकारी संस्था/ ठेकेदार/कंपणी मार्फत ठेकेपध्दतीन बाहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ पुरविण्यासाठी निविदा/दरपत्रक सादर करणेबाबत...

सुचनेद्वारे खाली नमुद केल्यानुसार गहू संशोधन विभागाकरीता सहकारी संस्था/ठेकेदार/कंपनी या बाहयस्त्रोतांकडून मनुष्यवळ पुरविण्यासाठी निविदा / दरपत्रक या कार्यलयास दि. २६/१२/२०२३ रोजी १२.०० वाजे पर्यत किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावे.

| अ.क्र. | मनुष्यबळ | संख्या | कामाचा वेळ | दर प्रती दिवस |
|---|---|---|---|---|
| १ | मजुर | १ | ८ तास | |
| २ | अर्ध कुशल कामगार | १ | ८ तास | |
| ३ | कुशल कामगार | १ | ८ तास | |
| ४ | कॉम्पुटर ऑपरेटर, टेकनिकल | १ | ८ तास | |
| ५ | सुरक्षारक्षक, चौकीदार | १ | ८ तास | |

टिप : गहू संशोधन विभागाच्या गरजेनुसार मनुष्यबळांची संख्या कमी अधिक होऊ शकते.

कृपया दर नमुद करतांना पुढिल पानावर दिलेल्या सुचना तसेच अटी व शर्ती काळजीपूर्वक लक्षात घ्याव्यात.

C:\Users\Administrator\Desktop\letterpad\marathi letter 2019-20 (Autosaved).docx

सुचना :

१. दरपत्रके सिलबंद पाकीटात पाठवावीत.
२. दरपत्रकाच्या पाकीटावर या निविदा सुचनेचा संदर्भ क्र. नमुद करावा. निवीदा दरपत्रकातील मानधन सर्व करांसहीत असावेत. ज्या सेवांना (जीएसटी) लागू आहे त्याबातच (जीएसटी) नमुद करावे.
३. दरपत्रकासोबत संस्थेचे नोंदनी प्रमाणपत्र, जी.एस.टी., भविष्य निर्वाह नोंदणी, अनुभव प्रमाणपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड इ. प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
४. निविदा दरपत्रके वरीष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, गहू संशोधन विभाग, डॉ. पंदेकृवि., अकोला यांचे नावाने दयावे. तसेच पाकीटावर **''मनुष्यबळ पुरविण्याकरिता दरपत्रक''** असे नमुद करावे. तसेच दरपत्रकावार मोबाईल क्र. नमुद करावा.
५. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे, तसेच निविदा प्रक्रीया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

अटी व शर्ती :

१. सदर कामे ही दैनंदीन स्वरूपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे दैनंदिन आठ तासाचे काम राहील.
२. कुठल्याही दिवशी मनुष्यबळाचे कामावर हजर राहणे शक्य होत नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तिची व्यवस्था किंवा कामावर हजेरी लावण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राही.
३. सदर कामे ही पुर्णत: बाहयस्त्रोतांकडुन असल्याकारणाने जेष्ठता यादीत कामाची अथवा कामगाराच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही.
४. काम समाधानकारक नसलयास कोणतीही पुर्व सुचनेशिवाय मनुष्यबळाला कामावरून काढुन टाकण्याचे संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरी धारक यांचे कडे राहतील.
५. किमान वेतन कायद्याचे पालन करावे.
६. कामावरील मनुष्यबळाचे अपघात विमा, भ.नि.नि. खाते, व्यवसाय कर वा वेळोवेळी शासन निर्णयानुसार देय लाभ उपलब्ध करून देण्याची संपुर्ण जबाबदारी सेवा पुरविणा–या कंत्राटदार संस्था/कंपणी/ठेकेदार यांची राहील.
७. सदर मनुष्यबळ पुरविणारी संस्था नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे. नोंदणीचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत जोडण्यात यावे. तसेच जीएसटी नोंदणी संदर्भातील दस्तऐवज सोबत जोडण्यात यावेत. सदर दरपत्रक दि. ................ रोजी दुपारी ४.०० वाजता वरीष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, गहू संशोधन विभाग, डॉ. पंदेकृवि., अकोला यांचे कक्षात उघडण्यात येईल.
८. अपुर्ण तृटीपूर्ण अथवा संबांधीत दस्तऐवज न जोडलेली दरपत्रके रद्द करण्यात येतील.
९. सदर संस्था/कंपनी/ठेकेदार असमाधानकारक काम करीत असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकर्त्याकडे असतील.

वरीष्ठ संशोधन शास्त्रज्ञ
गहू संशोधन विभाग
डॉ प दे कृ वि. अकोला

Officer In Charge, Agricultural Research Station, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 485
Dt. 19/12/2023